लश्रेल:हीींिः/ /्शल्ुहरीीरि.लैा/६०७७१०१८-४३२०-४षर७-९२शर२-शलर३५७३१शष२श
MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र


# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## वाळू माफियांच्या विरोधात छापलेल्या महाराष्ट्र आरंभच्या बातमीची पोलीस अधीक्षकांकडून दखल. चकलांबा हद्दीत धीरज कुमार यांनी केली कारवाई

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२३९ | बुधवार दि.२२ मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -239 | WEDNESDAY DT. 22 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# आयपीएस धीरज कुमार हे कारवाई करतात. पण डी वाय एस पी राजगुरु बांगर एकशिंगे नरके कारवाई का करत नाहीत

गेवराई / प्रतिनिधी

**मागील काही दिवसांपासून गेवराई तालुक्यात वाळू माफियांचा धुमाकूळ पाहायला मिळत असून, आता त्यांची हिंमत एवढी वाढली की, वाळू माफियांनी थेट पोलीस पथकावर हायवा घालण्याचा प्रयत्न केला आहे. अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या आयपीएस डॉ. धीरजकुमार बच्चू यांच्या पथकातील कर्मचारी यांनी अवैधरीत्या वाळू वाहतूक करणाऱ्या तीन हायवा वाळूसह पकडून ताब्यात घेऊन चकलांबा पोलीस ठाण्यात घेऊन जाताना, एक काळ्या रंगाची स्कॉर्पिओ आडवी लावून, माझी गाडी सोडा मी एक लाख देतो असे म्हणत, पोलीस कर्मचाऱ्यासोबत हुज्जत घालू लागला. तसेच रस्त्याच्या कडेला पडलेल्या काट्या बाजूला करण्यासाठी गाडीच्या खाली उतरलेल्या पोलीस कर्मचाऱ्याच्या अंगावर हायवा घालण्याचा प्रयत्न करून वाळू माफियांनी हायवा पळवला असल्याची घटना (दि.२२ मे) रोजी सकाळी घडली आहे. अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या तीन हायवा ताब्यात घेऊन जवळपास १ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरील ही कारवाई आयपीएस डॉ.धीरजकुमार बच्चू यांच्या पथकाने केली आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई तालुक्यातून गेलेल्या गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैधरीत्या वाळू उपसा हा सतत चालू आहे. तो उपसा करून या वाळूची चोरट्या मार्गाने वाहातूक केली जाते. राक्षसमुवन, सुरळेगाव येथे तर वाळू माफियांनी अक्षरशः उच्छाद मांडला आहे. त्या अनुषंगाने आयपीएस डॉ. धीरजकुमार बच्चू यांना एका गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, उमापूर मार्गे अहमदनगर जिल्ह्यात अवैध वाळू भरून हायवा जात आहे. त्यानुसार आयपीएस डॉ. धीरजकुमार बच्चू यांच्या पथकातील तीन पोलीस कर्मचारी खाजगी वाहनाने माजलगाव वरून राक्षसभुवन परिसरात आले असता, राक्षसभुवन ते उमापूर रस्त्यावर एक बिना नंबरचा हायवा आढळताच त्याला अडवून हायवा चालकाला रॉयलटीची विचारना केली असता. चालकाने पावती नसल्याचे सांगितले, तसेच गाडी नंबर सांगण्यास नकार दिला. आणि त्यावेळी त्या पाठोपाठ आणखी दोन हायवा आले, त्यांनाही ताब्यात घेऊन जात असताना. मध्येच काळ्या रंगाची स्कॉर्पिओ आडवी लावून माझी गाडी लावू नका, माझी गाडी सोडा, मी एक लाख रुपये देतो, असे म्हणत पोलीस कर्मचाऱ्यासोबत हुज्जत घालू लागला. परंतु मात्र पोलीस कर्मचाऱ्यानी या कुठल्याही आमिषाला बळी न पडल्याने रस्त्यावर बाभळीच्या झाडे आडवी लावली ते काढण्यासाठी पोलीस कर्मचारी रस्त्यावर उतरला याच संधीचा फायदा घेऊन हायवा चालक व मालकाने पोलीस कर्मचाऱ्याच्या अंगावर घालण्याच्या प्रयत्न करून पलायन केले. शारूख शब्बीर पठाण (रा.चकलांबा, ता.गेवराई) व अहमद भाई असे हायवा चालकाचे नाव असल्याची माहिती असून ज्या पोलीस कर्मचाऱ्याच्या अंगावर हायवा घालण्याचा प्रयत्न केला त्या कर्मचाऱ्याचे आस्तिक कुमार देशमुख असल्याचे समजते आहे. तसेच एक कोटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी चकलांबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.








- डीवायएसपी राजगुरू यांच्या जवळचे पोलीस कर्मचारी आर्थिक कलेक्शन करण्यासाठी दोन नंबर वाल्यांच्या सोबत फोनवर बोलत आहेत सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे कॉल डिटेल्स काढणे गरजेचे? वाळू माफियांची हिंम्मत वाढली
- चक्क पोलिस पथकातील पोलीस कर्मचाऱ्याच्या अंगावर हायवा घालण्याचा प्रयत्न चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना; एक कोटीचा मुद्देमाल जप्त आयपीएस डॉ. धीरजकुमार बच्चू यांच्या पथकाची मोठी कारवाई

**गेवराई तलवाडा चकलांबा पोलीस स्टेशनचे कर्मचारी कलेक्शन साठी खाजगी माणसं ठेवून बाहेर ड्युटीला गेले तरी वसुली चालूच असते वाळू माफिया अंगावर गाडी का घालणार नाही सांगा तुम्ही?**

**महाराष्ट्र आरंभ इफेक्ट**

### डी वाय एस पी राजगुरू तहसीलदार खोमणे ईसी मध्ये बसून किती खातेदार आहेत आपल्या खात्यात हे तपासण्यात पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सोबत संगमत करून वाळू माफियांना पोचत आहेत.?

वाळू माफियांची मुजोर पणा वाढला पोलिसाच्या अंगावर गाडी घालण्यात वाळूमाफिया मागे का सरकत नाही तर याच वाळूमाफियांनी अनेक पोलीस कर्मचारी व वाळू माफिया असलेले अनेक गुंड प्रवृत्तीचे लोक हे सध्या पोलीस प्रशासनाच्या व संबंधित गेवराई चकलांबा तलवाडा या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अधिकारी कर्मचारी यांच्यासोबत हात मिळवणे करून यांच्या दारूच्या पार्ट्या हॉटेलमध्ये होतात यांच्या खाण्यापिण्याच्या मासे मटण दारू याच्यावरती पोलीस प्रशासनातील काही कर्मचारी मिंदे झालेले दिसून येत आहे म्हणून हे सर्वजण वाळू माफिया मिळून पोलिसांच्या अंगावरती हायवा घालून पोलिसाला जीवा मारण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु याच पोलीस कर्मचाऱ्यांचे आयपीएस अधिकारी धीरज कुमार यांनी कारवाई करत वाळू माफी यांना आव्हान दिले आहे वाळू माफिया यांच्या विरोधात थेट कारवाई करण्याचे धाडस यावेळी खरे तर धीरज कुमार यांचे ऐवजी चकलांबा पोलीस स्टेशनचे नारायण एक शिंगे गेवराईचे प्रवीण कुमार बांगर तलवाडा चे सोमनाथ नरके या पोलीस अधिकारी यांनी ही कारवाई करणे गरजेचे आहे परंतु बाहेरून अधिकारी येऊन त्या ठिकाणी कार्य करतात याचा अर्थ नेमका अजून सुद्धा पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांना कळालेला दिसून येत नाही

### गेवराई चकलांबा तलवाडा पोलीस स्टेशनचे प्रभारी एकशिंगे, बांगर, नरके, सब माल अंदर करण्यातच व्यस्त?










# लाचखोरीचे ग्रहण, खाकी वर्दीला डाग!

## चकलांबा पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार एसीबीच्या जाळ्यात

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पाच हजाराची लाच स्वीकारताना पोलीस हवालदाराला रंगेहाथ पकडले

नवनाथ आडे / गेवराई

शेतीच्या वादातून दाखल करण्यात आलेल्या अदखलपात्र गुन्ह्यात प्रतिबंधात्मक कारवाईमध्ये मदत करण्यासाठी पाच हजार रुपये लाच स्वीकारणाऱ्या पोलीस हवालदाराला छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून रंगेहात पकडले. पोलीस हवालदार मारुती रघुनाथ केदार (वय-३५ रा. चकलांबा, ता गेवराई, जि बीड) असे लाचखोर पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. ही कारवाई मंगळवारी (दि.२१) करण्यात आली.

याबाबत ३४ वर्षीय व्यक्तीने छत्रपती संभाजीनगर एसीबी कार्यालयात तक्रार दिली आहे. आरोपी पोलीस हवालदार मारुती केदार हे चकलांबा पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. तक्रारदार व त्यांचे चूलते यांच्यात शेतीच्या वादातून भांडण झाले आहे. त्यामुळे चकलांबा पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी अदखल पात्र गुन्ह्यांची नोंद झाली होती. त्यामध्ये प्रतिबंधक कारवाईमध्ये मदत करण्यासाठी आरोपी पोलीस हवालदार मारुती केदार यांनी पाच हजार रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रारदार यांनी एसीबी कार्यालयात पोलीस हवालदार केदार पैसे मागत असल्याची तक्रार केली.

छत्रपती संभाजीनगर एसीबीच्या पथकाने पडताळणी केली असता पोलीस हवालदार केदार यांनी तक्रारदार यांच्याकडे पाच हजार रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एसीबीच्या पथकाने सापळा रचला. तक्रारदार यांच्याकडून पाच हजार रुपये लाच स्वीकारताना पोलीस हवालदार मारुती केदार यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्यावर चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई एसीबी छत्रपती संभाजीनगर परिक्षीत्राचे पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजयमाला चव्हाण, पोलीस निरीक्षक अमोल धस, पोलीस अंमलदार सिंदकर, युवराज हिवाळे, चालक शिंदे यांच्या पथकाने केली



# खडकत येथे जिल्हा सिमेलगत पशु वाहतुकीस बंदी

बीड / प्रतिनिधी

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी मौजे खडकत ता. आष्टी जि. बीड या ठिकाणी ब-याच वर्षापासून कत्तलखाने अवैधपणे सुरु असून कत्तल पासून निर्माण होणारी घाण गावाच्या आजुबाजुला टाकली जात असल्यामुळे भयंकर दुर्गंधी येत असून तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

सदर ठिकाणी गोवंशाची कत्तल झाल्यानंतर सर्व अवशेष हे नदीपात्रामध्ये फेकले जातात त्याशिवाय रक्त आणि इत्तर विना उपयोगी अवशेष हे लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण करतात. या ठिकाणी गोवंश जनावरांचे हाडे त्यांचे शरीराचे कत्तल केलेले भाग जसे की खूर, पास, शिंग व डोके अर्धवट कुजत असलेल्या अवस्थेमध्ये दिसून आले आणि जे एकंदरित मानवी आरोग्याला आणि पशु आरोग्याला धोकादायक आहे. खडकत या गावातील आरोपी अहमदनगर- बीड सीमेवरील भागात अवैध कत्तली करून मांस विक्रीसाठी इतरत्र वाहतूक करत असल्याचे दिसून येते.

खडकत या गावाला होणारी पशुंची वाहतूक प्रामुख्याने अहमदनगर जिल्हयामधून होणारी असल्यामुळे अहमदनगर जिल्हयामधून येणा-या आणि जाणा-या पशुच्या वाहतुकीसाठी जी वाहतुक रस्त्याने चालत-चालत किंवा वाहनामार्फत होते त्यावर बंदी घालण्याचे आदेश निर्गमित करण्याची विनंती केली आहे.

मौजे खडकत ता. आष्टी जि. बीड या गावामध्ये कोणताही पशुंचा मोठा बाजार भरत नाही किंवा इतर गोष्टीसाठी पशुंची वाहतूक करण्याचा प्रश्न उध्दभवत नाही पत्रात नमूद करण्यात आलेल्या परिस्थितीमध्ये पशुंची होणारी वाहतूक ही फक्त अवैध कत्तलीसाठी होते या निष्कर्षाप्रत मुख्य कार्यकारी अधिकारी पोहोचले आहेत व या निष्कर्षाशी सहमती दर्शवणे क्रमप्राप्त आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १३३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मौजे खडकत ता. आष्टी जिल्हा बीड या गावांमध्ये अहमदनगर जिल्हयामधून व या गावातून अहमदनगर जिल्हयामध्ये होणा-या पशुच्या वाहतुकीसाठी पूर्णत:बंदी घालण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी कळविले आहे.

# विजयकुमार गंडले यांच्या जयंतीनिमित्त, उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप संपन्न

परळी / प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री ना धनंजय मुंडे यांचे विश्वासू सहकारी,आंबेडकरी चळवळीतील नेते विजयकुमार गंडले यांच्या जयंतीनिमित्त परळी उपजिल्हा रुग्णालयात आज दिनांक २१ मे रोजी रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.



याप्रसंगी प्रथम महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन वैद्यकीय अधीक्षक डॉ अरुण गुट्टे यांच्या हस्ते करण्यात आले.तर सोनोग्राफी तज्ञ डॉ.दिनेश कुरमे यांच्या हस्ते विजयकुमार गंडले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.या वेळी परळी न.प.चे माजी उपनगराध्यक्ष अय्युब खान पठाण, दादाराव क्षीरसागर,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, जेष्ठ नेते सोपानराव ताटे,ऐकतावादी आंबेडकर रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष सुनील कांबळे,सामाजिक कार्यकर्ते दत्ता सावंत,रवी मुळे,भारत ताटे,पत्रकार रानबा गायकवाड, पत्रकार धिरज जंगले,अनंत कुलकर्णी, विकास वाघमारे,विलास ताटे, राजाभाऊ जगतकर, संतोष व्हावळे,जेष्ठ साहित्यिक अजयकुमार गंडले, गौतम गंडले आदि मान्यवर उपस्थित होते.

उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्व रुग्णांना या वेळी केळी, सफरचंद व बिस्कीट वाटप करण्यात आले.सम्राट गंडले,कार्यक्रमास प्रताप समिंदरसवळे,पंडित रोडे, विजय कांबळे, विजय शिंदे, राजेंद्र जाधव, आनंद तुपसमुद्रे, शेख रफिक,यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## १२ वी बोर्ड परिक्षेत साधना साळुंकेचे घवघवीत यश

बीड : नागापूर खुर्द येथील पत्रकार चंद्रकांत साळुंके यांची कन्या साधना साळुंके हिने इयत्ता बारावी सायन्समध्ये ८१ टक्के मिळवून यश संपादन केले आहे. बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील रहिवाशी साधना चंद्रकांत साळुंके हिने १२ बोर्ड परिक्षेत इंग्रजी-५८,मराठी ८६, मॅथ-९०, फिजीक्स-१, केमिस्ट्री ८९, बायलॉजी-९२ गुण प्राप्त केले. तिने मिळविलेल्या या यशाबद्दल



अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

# खुर्चीवर बसण्याऐवजी जमिनीवर बसण्याची सवय लावा, होतील हे बरेच फायदे

**जमिनीवर ज्या पद्धतीने लोक बसतात ते एक प्रकारचे आसन असते. यामुळे शरीरास अनेक फायदे होतात. असे केल्याने पोट तसेच पायांचे आरोग्य चांगले राहते.**

**जमिनीवर बसून जेवल्याने पाचनशक्तीही सुधारते.**


जमिनीवर बसणे हे खर्ची-अथवा सोफ्यावर बसण्यापेक्षा अधिक फायदेशीर असते. हा आपल्या संस्कृतीचा एक भाग आहे. आजही अनेक घरांमध्ये जमिनीवर बसून जेवण्याची



पद्धत आहे. असे केल्याने शरीरास अनेक फायदे मिळतात. यामुळे पाचनसंस्था सुधारते. बॉडीची फ्लेक्सिबिलिटी कायम राहते. तसेच अन्य फायदे होतात.

जमिनीवर पद्मासनात बसल्याने मेडिटेशनसाठी फायदेशीर ठरते. यामुळे तणाव कमी होतो. तसेच शरीरात ऑक्सिजन सप्लाय वाढतो.जमिनीवर बसल्याने शरीराची लवचिकता वाढते. अनेक समस्यांपासून बचाव होतो. यामुळे आपण ॲक्टिव्ह राहतो.

# तीव्र वळण ठरतेय अपघाताचे कारण, रिंगरोडवर जीव मुठीत धरून प्रवास



अंबाजोगाई / प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील संत भगवान बाबा चौक ते तथागत चौक रिंगरोडवर फरशीच्या कारखान्यासमोर मोठे वळण आहे. याच वळणावर शेतीकडे जाणारा मोठा शेतरस्ता आहे. हे वळण धोकादायक व अपघाताचे केंद्र बनल्याने,अश्याही स्थितीत येणाऱ्या सुसाट वाहनांमुळे या रोड वरून जाणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.

शहराच्या विकासाच्या दृष्टीने भगवान बाबा चौक ते यशंतराव चव्हाण चौक हा रिंगरोड मार्गाच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. हा रस्ता आता विस्तीर्ण झाला आहे. परिणामी लातूर,परळी येथून अंबाजोगाई शहरात प्रवेश न करता या रिंगरोडने सहज जाता येते. त्यामुळे या रोडवर मोठ्या प्रमाणावर वाहनांची संख्या झाली आहे. मात्र याच मुख्य रस्त्यावर फरशी कारखान्यासमोर मोठ्या वळणाचा रस्ता आहे. याच ठिकाणी शहरातील व परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात जाणारा शेतरस्ता ही याच ठिकाणी आहे. या रोडवरून अनियंत्रित व भरधाव वेगाने जाणारी वाहने वळणाचा रस्ता समोर दिसत असूनही आपल्या वाहनाची स्पीड कमी करत नाहीत. परिणामी या रस्त्यावर लहान मोठे अपघात सातत्याने घडत आहेत. अनेक अवजड वाहने याच वळणावर पलटी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. अश्या स्थितीत शेत रस्त्याने शेताकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांना आपला जीव मुठीत धरून या रोडवरून शेताकडे जावे लागते. अनेकदा सकाळी दूध घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना शाळा, कॉलेजसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना इथे भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे अपघाताला सामोरे जावे लागले आहे. याची अनेक उदाहरणे आहेत. अशी स्थिती असतानाही प्रादेशिक परिवहन विभाग या महत्वपूर्ण समस्येकडे दुर्लक्ष करीत आहेत. एकाच आठवड्यात सलग दोन वेळा अवजड वाहने पलटी झाल्याची घटना इथे होऊनही प्रशासन कसलीही दखल घेत नसल्याने हे वळण दिवसेंदिवस धोकादायक बनत चालले आहे. त्यामुळे याठिकाणी गतीरोधक बसवण्याची गरज आहे.

प्रशासनाने कार्यवाही करावी आमच्या शेतीकडे जाण्यासाठी जाणारा शेतरस्ता याच धोकादायक वळणाच्या बाजूंनी जातो. सुसाट वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे अनेक शेतकऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे अपघात याच ठिकाणी झालेले आहेत. या धोकादायक वळणाच्या ठिकाणी गतिरोधक बसवून या परिसरातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे. अन्यथा या अपघातांचा सामना शेतकऱ्यांना सातत्याने करावा लागेल, असे शेतकरी संतोष काळे यांनी सांगितले.

# बारावी परीक्षेत बीड जिल्हा विभागात सर्वप्रथम



बीड : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता बारावीचा निकाल जाहीर झाला आहे. बोर्डाकडून घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत निकालाची आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात बीड जिल्ह्याचा सर्वाधिक ९५.७० टक्के निकाल लागला आहे. बीड जिल्ह्याने बारावीच्या निकालात सर्वप्रथम येण्याची परंपरा यंदाही कायम ठेवली असल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे.

जिल्ह्यात वडवणी तालुक्याचा सर्वाधिक ९७.३१टक्के इतका निकाल लागला आहे. बीड जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेसाठी ४० हजार २४८ मुला-मुलींनी नोंदणी केली होती. यापैकी ३९ हजार ७९८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी ३८ हजार ९० विद्यार्थी बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये २२ हजार ६७७ मुले आणि १५ हजार ४१३ मुली उत्तीर्ण झाले आहेत.मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९६.६७ इतके असून मुलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९५.०६ टक्के इतके आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा ९४.२१ टक्के निकाल लागला असून बीड जिल्ह्याचा सर्वाधिक ९५.७० टक्के इतका निकाल लागला आहे या पाठोपाठ परभणी जिल्ह्याचा ९०.४२ टक्के जालना जिल्ह्याचा ९४.७१टक्के तर हिंगोली जिल्ह्याचा ९१.६८ टक्के निकाल लागला आहे

तालुकानिहाय निकाल
वडवणी : ९७.३१ टक्के
बीड : ९६.९५ टक्के
पाटोदा : ९५.२९ टक्के
आष्टी : ९४.९५ टक्के
गेवराई : ९५.८४ टक्के
माजलगाव : ९४.४८ टक्के
अंबाजोगाई : ९२.५८ टक्के
केज : ९६.७१ टक्के
परळी : ९५.७४ टक्के
धारूर : ९१.५८ टक्के
शिरूरकासार ९५.२२ टक्के

# उजनी जलाशयात बोट बुडून दुर्घटना



## बेपत्ता व्यक्तींच्या शोधकार्यासाठी एनडीआरएफ पथक आले धावून

सोलापूर जिल्ह्यात उजनी जलाशयात अचानकपणे आलेले वादळी वारे आणि वावटळीमुळे हेलकावे खाऊन बोट बुडाली. यात एका दाम्पत्यासह सहाजण बेपत्ता झाले.

उजनी जलाशयात बोट बुडून बेपत्ता झालेल्या सहा व्यक्तींच्या शोधकार्यासाठी एनडीआरएफची तुकडी दाखल झाली असताना दुर्घटनाग्रस्त जलाशयाच्या काठी बेपत्ता व्यक्तींच्या नातेवाईकांसह गावकरी एकत्र आले. सोलापूर : सोलापूर जिल्ह्यात उजनी जलाशयात अचानकपणे आलेले वादळी वारे आणि वावटळीमुळे हेलकावे खाऊन बोट बुडाली. यात एका दाम्पत्यासह सहाजण बेपत्ता झाले. दरम्यान, शोधकार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) तुकडीला पाचारण करण्यात आले असून बेपत्ता झालेल्या व्यक्तींचा रात्रभर शोध घेऊनही त्यापैकी एकाचाही शोध लागला नव्हता. त्यामुळे पुन्हा दुसऱ्या दिवशी शोधकार्य सुरू करण्यात आले आहे.

उजनी जलाशय क्षेत्रातील कुगाव (ता. करमाळा) येथून अवघ्या काही अंतरावरील कळाशी आणि आजोती (ता. इंदापूर) येथे मंगळवारी सायांकाळी निघालेल्या बोटीत सातजण बसले होते. परंतु पुढे थोड्याच वेळांत अचानकपणे वादळी वाऱ्यासह वावटळ आली. यात बोट हेलकावे खाऊन जलाशयात बुडाली. यात गोकुळ दत्तात्रेय जाधव (वय ३०) आणि त्यांच्या पत्नी कोमल (वय २५) यांच्यासह त्यांच्याच कुटुंबातील शुभम गोकूळ जाधव (वय दीड वर्ष) आणि माही गोकुळ जाधव (वय ३, सर्व रा. झरे, ता. करमाळा) तसेच अनुराग अवघडे (वय ३५) आणि गौरव धनंजय हजारे (वय १६, रा. कुगाव) हे सहाजण बेपत्ता झाले. याच बोटीतून प्रवास करणारे सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालयातील फौजदार राहुल डोंगरे हे सुदैवाने न डगमगता पोहत कळाशी येथे जलाशयाच्या किनाऱ्यावर पोहोचले. त्यांनी दुर्घटनेची माहिती गावकऱ्यांना दिली. त्यानंतर गावकरी बोट बुडालेल्या ठिकाणी धावून आले. पट्टीच्या पोहणारे तरुण आणि मच्छिमारांनी शोधकार्य सुरू केले.

# कु.माहेश्वरी खोमणे व कु.गौरी वादगे यांचे एचएससी बोर्ड परीक्षेत यश



पाटोदा: नितीन भोंडवे

नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेत पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी येथील कु माहेश्वरी रामचंद्र खोमणे हिने ८३.५० टक्के तर कु. गौरी मुकुंद वादगे हिने ८२.१७ टक्के प्राप्त करून घवघवीत यश मिळवले आहे. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पिठ्ठी येथील या दोन्ही विद्यार्थिनींनी यश संपादन पालकांची मान उंचवण्याचे काम केले आहे. अभ्यासात सातत्य, शिक्षक वृंद, आई-वडील, भाऊ- बहीण, यांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच आपण हे यश मिळवू शकलो असे मत त्यांनी व्यक्त केले. दरम्यान यशाबद्दल त्यांचे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व नातेवाईकांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी कला शाखेचा निकाल ९७.२९ टक्के

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर उच्च माध्यमिक विद्यालयाचा कला शाखेचा निकाल ९७.२९ टक्के लागला असून साक्षी कृष्णा खिरे ७९.१७, अनिकेत दिपक साळवे ७३.३३, आरती अर्जून फुलगे ७२.१७ असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा.शंकर राठोड, प्रा.संदिप लऊळकर, प्रा.निर्मला चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, उपाध्यक्ष ड.आर.डी.भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी.देशमुख, संचालक शिरीष देशमुख, डॉ.सचिन देशमुख, प्राचार्य अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक संतोष जोशी यांनी अभिनंदन केले.







# राजमाता जिजाऊ महाविद्यालयाची बारावी बोर्ड परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. यामध्ये बारावी विज्ञान शाखेचे एकूण १५२ विद्यार्थ्यांपैकी १५० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विज्ञान शाखेचा - निकाल ९९.३३% लागला. विज्ञान - शाखेतून सर्वप्रथम कु. थोरात देवयानी धनंजय ८९.००%, द्वितीय कु. मुंडे - साक्षी संदीप ८७.१७% व तृतीय क्रमांक

कु. शिनगारे विशाखा विजय ८६.५०% या विद्यार्थिनींनी प्राप्त केला. वाणिज्य शाखेतील ३३ परीक्षार्थीपैकी ३० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९३.७५ टक्के निकाल आहे. वाणिज्य शाखेतून प्रथम कु. पवार ऋतुजा शंकर ८४.३३%, द्वितीय क्रमांक कु. उडगे तेजस्विनी नारायण ८२.८३% तर तृतीय क्रमांक कुरवडे प्रतीक रतन ७६.६७% या विद्यार्थ्यांनी मिळविला. तर कला शाखेच्या ८५ परीक्षार्थीपैकी ७७ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९५.०६% निकाल लागला. कला शाखेत प्रथम क्रमांक कसपटे रत्नेश्वर लहू ७०.८३%,

द्वितीय कु. गिरी राधा भीमराव ७०.५०% तर तृतीय क्रमांक कु. जाधव रेणुका शंकर ६९.३३% यांनी प्राप्त केला. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी २०२४ बारावी बोर्ड परीक्षेत मिळविलेल्या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके, सचिव आ. सतीश चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख सदस्य जयसिंगभैय्या सोळंके, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य लोभाजी चव्हाण, अजयसिंह दिख्खत, महाविद्यालय विकास समितीचे निमंत्रित सदस्य डॉ. राम शिनगारे, इं. ना. जाधव

बारावी बोर्ड परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी शैक्षणिक शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली व महाविद्यालयाचे नाव उंचाविले याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले. परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण घ्यावे असे सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्यप्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. गहिनिनाथ गोयेकर, प्रा. सच्चिदानंद ढेपे, प्रा. प्रताप भानुसे, प्रा. टी. एन. ढवळे, प्रा. जगदीश शिंदे, प्रा. धनराज सोळंके, प्रा. संदीप गायकवाड, प्रा. विराज देशमुख, प्रा. रागिनी सोनवणे, प्रा. राम लोखंडे, प्रा. बांगर, प्रा. कोमल सोळंके, प्रा. वैरागे या सर्व प्राध्यापक वर्गाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी अभिनंदन केले. तसेच सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## रूपाली घुले यांनी बारावी परीक्षेत ६९ टक्के गुण मिळवून यश संपादन केले



बीड (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील रेवकी देवकी या छोट्याशा गावची कन्या कुमारी रूपाली संजय घुले या मुलीने आज लागलेल्या बारावीच्या निकालामध्ये सायन्स शाखेतून उत्कृष्ट प्रकारे ६९ टक्के मार्क घेऊन यश संपादन केल्याबद्दल रूपाली घुले यांचे गेवराई तालुक्यातून तसेच बीड शहरातून बीड जिल्ह्यातून त्यांच्या उत्कृष्ट अभ्यास कौशल्याचे अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वांकडून मनस्वी शुभेच्छा मिळत आहेत रूपाली घुले या भविष्यात उत्कृष्ट चांगल्या प्रकारे मोठ्या शहरांमध्ये पुढील वैद्यकीय शिक्षण घेऊन एक अप्रतिम आणि उत्कृष्ट डॉक्टर होऊन सर्व रुग्णांची सेवा करणार असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना आपले अनमोल विचार व्यक्त केले

# विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला




अभिनंदन अभिनंदन

ग्रामीण विकास प्रतिष्ठान कळंब संचलित वालचंद विद्यालय व जुनिअर कॉलेज कळंब ता- इंदापूर जि- पुणे कॉलेजचा महाराष्ट्र स्टेट बोर्ड तर्फे घेण्यात आलेल्या एचएससी फेब्रुवारी /मार्च २०२४ बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला यामध्ये वालचंद विद्यालय व जुनिअर कॉलेज कळंब या विद्यालयातील विज्ञान शाखेतील एकूण ९९ विद्यार्थी परीक्षेत बसले होते ते ९९ विद्यार्थी चांगल्या मार्काने उत्तीर्ण होत विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला तसेच वाणिज्य शाखेत एकूण ६९ विद्यार्थी परीक्षेत बसले असून ६९ विद्यार्थी पास होऊन वाणिज्य शाखेचा निकाल शंभर टक्के लागला तसेच कला शाखेमध्ये ८७ विद्यार्थी परीक्षेस बसले त्यातील ८३ विद्यार्थी पास होऊन कला शाखेचा निकाल एकूण ९५.४०% लागला तरी ज्या विद्यार्थ्यांनी तिन्ही शाखेत उत्तम यश मिळवलेले आहे त्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

कला शाखाकु. पोळ सिद्धी मनोहर प्रथम क्रमांक ७९.६६% कु.भालेराव प्राजक्ता संजय द्वितीय क्रमांक ७८.८३% कु. हेगडे कांचन दत्तात्रय तृतीय क्रमांक ७३.५०% कु. चव्हाण प्रियंका चव्हाण तृतीय क्रमांक ७३.५०%

वाणिज्य शाखा

कु. पवार प्रज्योत सुनील प्रथम क्रमांक ८० टक्के कु. गुलाल जगदीश रामभाऊ द्वितीय क्रमांक ७८.६७ टक्के कु. तुपे पायल सोमनाथ तृतीय क्रमांक ७७.८३%

विज्ञान शाखाकु. चव्हाण प्रेरणा गणेश प्रथम क्रमांक ८९.३३%

कु. निंबाळकर मानसी घनश्याम द्वितीय क्रमांक ८६%

कु. रुपनवर आकाश सुभाष तृतीय क्रमांक ८४.६७%

सर्व यशस्वी विद्यार्थी विद्यार्थिनींचे ग्रामीण विकास प्रतिष्ठान कळंब संस्थेचे अध्यक्ष श्री रामचंद्र दादा कदम उपाध्यक्ष श्री मधुकर जी पाटील संस्थेचे सचिव सूर्यभान मोहिते सर्व सदस्य सदस्या विद्यालयाचे प्राचार्य श्री सर्वगोड सर सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून खूप खूप अभिनंदन आणि पुढील वाटचालीस खूप

# तलवाड्यात सतत वीज गुल नागरिक परेशान

गेवराई (प्रतिनिधी)

तालुक्यातील तलवाडा महावितरणचा कारभार राम भरोसे झाला असून या ठिकाणी कर्मचारी राहण्यासाठी क्वाटर असताना तालुका आणि जिल्ह्यात राहत आहे यामुळे नागरिकांना गेल्या अनेक दिवसापासून वीज सुरळीत मिळत नसल्याने नागरिक परेशानं तर कर्मचारी व ऑफिसचे दूरध्वनी क्रमांक बंद राहत आहेत यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात लाईट मिळत नसल्याने नागरिक हवाल दिल झाले आहे या प्रकरणी वरिष्ठांनी तात्काळ दाखल घेऊन संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी समाजसेवकाकडून होत आहे .

गेवराई तालुक्यातील महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्या बरोबर कनिष्ठ कर्मचाऱ्यांचा गोंधळ संपता संपेना तर काही अधिकाऱ्यामुळे शेतकऱ्यांना वीज सुरळीत मिळत नाही तर अनेकांना सौर पंप आलेला असताना फॉल्ट दाखवून अडवण्याचा प्रकार गेल्या काही दिवसापासून झालेला असून शेतकरी परेशान आहे याकडे सुद्धा वरिष्ठांनी लक्ष द्यावे.



तालुक्यातील तलवाडा या ठिकाणी ३३ केव्ही सबस्टेशन आहे या ठिकाणी जवळपास १४ कर्मचाऱ्यांचा स्टाफ आहे तर ऑपरेटर वेगळा आहे एवढे असताना या ठिकाणाहून आठ ते दहा गावाला विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी या ठिकाणी कॉटर असून कर्मचारी मात्र संबंधित क्वार्टरला न राहता तालुका आणि जिल्ह्यात राहून कारभार पाहत आहेत कधी आला आणि कधी गेला हे नागरिकांना माहित नाही. संबंधित कर्मचारी खाजगी हेल्पर च्या साह्याने विद्युत मंडळाच्या कारभार पाहत आहेत त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांना लोड शेडिंगचा भार सहन करावा लागत आहे तर सकाळी होती दुपारी गेली संध्याकाळी आली आता गेली असा प्रकार या ठिकाणी सुरू असून अनेक वेळा नागरिक संबंधित आपरेटरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत असताना दूरध्वनी क्रमांक हमेशाच बंद असतो तर या ठिकाणचे जे काही कर्मचारी आहेत त्यांचा पाच च्या नंतर नेहमीच मोबाईल वरून संपर्क होत नसल्याच्या तक्रारी नागरिकाकडून येत आहेत एवढे होत असताना संध्याकाळी नेहमीच विजेचा लपंडाव होत आहे तर रात्रभर अनेकदा वीज नागरिकांना मिळत नाही त्यामुळे अगोदरच उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असताना संध्याकाळी आभाळामुळे होणाऱ्या गर्मीमुळे जीव कासावीस होऊन अनेकांच्या जीव जातो की काय अशी भीती नागरिकांत निर्माण होत आहे तर दुसरीकडे मात्र संबंधित कर्मचाऱ्यांच्या दूरध्वनी क्रमांक बंद असल्यामुळे संपर्क कोणाकडे साधावा असा प्रश्न नागरिकात निर्माण होत आहे.

## खाजगी हेल्पर शिरजोर कर्मचाऱ्यांच्या दूरध्वनी बंद

तलवाडा गावात नेहमीच दिवसा तर रात्री वीज गायब होत असल्यामुळे नागरिक परेशान झालेले असताना कधी कधी रात्रभर वीज सुरळीत नसते तर दिवसा विचारणे अवघड असून याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता दूरध्वनी संपर्क होऊ शकला नाही .

विजपुरवठा संदर्भात काही फॉल्ट झाला तर कर्मचाऱ्याऐवजी खाजगी हेल्पर सर्वात पुढे असतात डीपी बसवणे तारा जोडणे फ्युज ट** कोणाचे कनेक्शन बदलणे कोणाला लाईट द्यायची का नाही हे खाजगी कर्मचाऱ्यांचे हातात असून या सर्वाला वरिष्ठ कर्मचारी पाठबळ देत असल्यामुळे नागरिक वैतागले असून गेल्या अनेक दिवसापासून या ठिकाणी वीज पुरवठा सुरळीत होत नसल्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढत आहेत तर अनेक वेळा नागरिक संपर्क साधण्याचा प्रयत्न करत असताना संबंधित कर्मचाऱ्यांचा व ऑफिसचा संपर्क होत नाही.

रात्री अंधाराचे साम्राज्य

तलवाडा या ठिकाणी पंधरा ते वीस हजार लोकसंख्येचे गाव असून रोज रात्री कोणत्या ना कोणत्या कारणाने विज गुल होते तर गेले काही दिवसापासून वादळ वाऱ्यामुळे विजेचा फॉल्टीचे कारणाने लाईट कधी येते आणि कधी जाते हे संबंधित लाईनमेनला माहित आहे की नाही असा प्रश्न नागरिकांत निर्माण होत असताना वीज ग्राहक व काही सामाजिक कार्यकर्ते हे संबंधित अधिकाऱ्याची संपर्क साधताना संपर्क होत नसल्याचे तक्रारी तलवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते शेख खिजर यांनी आपल्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले असून नोकरी तलवाड्याला राहायाला जिल्हा आणि तालुक्याला राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची तक्रार करणार असून या ठिकाणी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विरोधात उपोषण करणार असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले.

कर्मचारी पूर्ण स्टाफ असताना खाजगी हेल्पर कशाला तलवाडा या ठिकाणी महावितरण चा पूर्ण स्टाफ असताना खाजगी हेल्पर शिवाय कोणतेच काम होत नाही त्यामुळे खाजगी माणसाशिवाय कामे होत नाहीत मग कर्मचारी कशाला..? महावितरणच्या कर्मचाऱ्यांना अगडबंब पगार असताना खाजगी हेल्परकडून नागरिकांची भरमसाठ लूट करण्यासाठी खाजगी हेल्पर ठेवले आहेत की काय. ? असा प्रश्न नागरिकांत निर्माण होत आहेत तरी या प्रकरणी वरिष्ठांनी तात्काळ दखल देऊन तलवाडा महावितरणचे चालले तरी काय याची चौकशी करावी असे नागरिकात बोलले जात आहे.



**लिंबागणेश:- राज्य शासनाने पालकमंत्री शेत रस्ते योजना २७ फेब्रुवारी २०१८ रोजी जाहीर केली. या योजनेचे महाविकास आघाडी सरकारने नामकरण करून मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना नामकरण केले.मात्र ग्रामीण भागातील पाणंद रस्त्याची अवकळा मिटायला तयार नाही. शेतमाल बाजारात पोहचवण्यासाठी व शेतीमधील कमी होणारी मनुष्यबळाची उपलब्धता लक्षात घेता शेतीची कामे करताना यंत्राचा उपयोग वाढला आहे. यंत्रसामग्री शेतीपर्यंत जाण्यासाठी शेतीला बारमाही शेतरस्त्यांची गरज आहे.शेतरस्ते हे रस्ते योजनांमध्ये येत नसल्याने विविध स्त्रोतामधुन निधीच्या उपलब्धतेबाबत अडचणी निर्माण होतात.पावसाळ्यात शेतीमध्ये आंतरमशागत, पेरणी, मळणी,कापणी व इतर कामे यंत्रामार्फत केली जातात.या यंत्रसामुग्रीची वाहतूक करण्यासाठी पाणंद रस्ते सुयोग्य असणे गरजेचे आहे. शेतकरी आणि गावकरी समृद्ध व्हावा या उद्देशाने राज्यात मी समृद्ध तर गाव समृद्ध ही संकल्पना मग्रारोहयोतुन राबविण्यात येत आहे.गाव समृद्ध करण्यासाठी शेतरस्त्यांचे महत्व शहरांना जोडणा-या महामार्गाएवढेच आहे. पाणंद रस्त्यांच्या अभावामुळे शेतमालाच्या वाहतुकीला मर्यादा येतात आणि त्यामुळे शेतकरी फायद्याचे पीकही घेत नाही. मात्र या योजनेमुळे बोगस कामे दाखवुन गावपुढारी आणि प्रशासकीय अधिकारी समृद्ध होताना दिसत आहेत.**

## छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

# कार्यक्रमाला उपस्थित रहा - बाळू यादव



बीड ।प्रतिनिधी

शहरात छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम व धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान ची स्थापना करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बाळू यादव यांनी केले.

छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती दि. २६ मे रोजी साजरी होत आहे या निमित्ताने शहरात शिवशाहीर सुरेश जाधव यांचा पोवाडा चा कार्यक्रम होणार आहे तसेच कवी अभी मुंडे यांची शंभूगाथा आणि प्रा. विठ्ठल कांगणे यांचे मार्गदर्शन तरुणांना लाभणार आहे. छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान ची स्थापना ही या कार्यक्रमात होणार आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ५ वा. फटाका ग्राउंड रेणुका माता कमानी जवळ संभाजीनगर येथे होणार आहे. तरी नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बाळू यादव यांनी केले आहे.





# सामाजिक सलोखा जपा : जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड

गेवराई (प्रतिनिधी)

निवडणूक संपलेली आहे मतदान मशीन मध्ये बंद आहे आता प्रतीक्षा आहे ती चार जून च्या निकालाची निकाल येईल तो येईल आपण तो स्वीकारू महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांच आहे छत्रपती शिवाजी महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर .अण्णाभाऊ साठे. महात्मा ज्योतिबा फुले. राजश्री शाहू महाराज . सावित्रीबाई फुले .माता जिजाऊ. माता रमाई. माता अहिल्या देवी हौळकर. फातिमा शेख या महापुरुषांच्या विचारांचा महाराष्ट्र आहे सामाजिक समता व मानवतावाद महाराष्ट्रनी जपला आहे बीड जिल्ह्याला वारकरी संप्रदायाचा वारसा आहे त्यामुळे आता आपण सर्वांनी शांततेने घ्यावे सामाजिक स्वास्थ बिघडेल असे वकृत्व करू नये व सोशल मीडियावर कुठलीही पोस्ट दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी टाकू नये व सामाजिक सलोखा राखावा असे आव्हान सर्व जनतेला महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे

# ओंकार रापतवार यांचा रंगरेजा जगभरातील रसिकांना भुरळ घालणार

## आफ्रिका खंडातील साउथ वेस्ट तसेच इथोपिया टांझानिया इत्यादी देशात सलग चार महिने ओंकारचे लाईव्ह कॉन्सर्ट

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाईला मराठवाड्याची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखलं जातं आणि हीच ओळख कायम ठेवण्यासाठी नव्या पिढीतील युवा संगीतकार ओंकार रापतवार याने आपल्या कलेचा आविष्कार जगभरामध्ये पोहोचवून अंबाजोगाईकरांना सुखद अभिमानाचा क्षण निर्माण करून दिला आहे. अत्यंत कमी वयात आणि वेळेत एकाच वेळी अनेक वाद्य वाजवणारा, अत्यंत कमी वयात काही वर्षांपुर्वी दि रेन हा स्वतःचा संगीत अलबम काढून आपले सांगितीक करीयर सुरुवात करुन आंध्रप्रदेशातील दोन चित्रपटांना पार्श्वसंगीत देवून आंध्र चित्रपट सृष्टीत स्वतःची नवी ओळख निर्माण करणारा, मराठवाड्यातील अनेक नवोदित गायकांच्या गाण्यांना संगीतबद्ध करून प्रसिध्दीच्या झोतात आलेला ओंकार आता परदेशातील रसिकांना मोहित करण्यासाठी जातोय.

संगीत, साहित्य, क्रीडा या क्षेत्रामध्ये अंबाजोगाईकरांनी आपला स्वतंत्र ठसा निर्माण केलेलाच आहे. परंतु या सर्वांमधून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारा युवा संगीतकार ओंकार हा आगळावेगळाच म्हणावा लागेल. शास्त्रीय तबलावादनापासून आपल्या अध्ययनाला सुरुवात करणाऱ्या ओंकारने आज उत्तम कंपोजर आणि जगभरातील विख्यात गायकांना साथसंगत करणारा ड्रमर अशी वेगळी ओळख निर्माण केली आहे. जून जुलै ऑगस्ट सप्टेंबर २०२४ या चार महिन्याच्या कालावधीमध्ये ओंकारच्या रंगरेजा हा ग्रुप तांझानिया इथोपिया तसेच आफ्रिका खंडातील साउथ आणि वेस्ट आफ्रिकेमध्ये आपला कलाविष्कार सादर करून जगभरातील



रसिकांना भुरळ घालणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रंगरेजा ग्रुप इंडियन क्लासिकल, सुफी साँग, वेस्टर्न फ्युजन, सोलो, बॉलीवूड साँग त्याचबरोबर पाश्चात्य संगीत रसिकांसाठी इंग्लिश साँगही सादर करणार

### अंबाजोगाई करांसाठी प्रचंड अभिमानाचा क्षण

आहे.

ओंकार रापतवार याच्या नेतृत्वाखाली परदेशवारीवर निघालेल्या या रंगरेजा ग्रुपमध्ये रणबीर सिंग - गिटार, भैरवी पाटील शास्त्रीय गायिका, सौरभ बासरी, शाकीब - बेस गिटार यांची साथसंगत लाभणार आहे. सध्या नवीन पिढीमध्ये अनेक युवा संगीतकार नावारूपाला येत आहेत, प्रत्येकाची काही ना काही तरी वेगळी खासियत आहे. परंतु या प्रचंड स्पर्धेमध्ये सुध्दा ओंकार रापतवार याने आपली

स्वतःची ओळख निर्माण केलेली आहे. स्वतः संगीतकार आणि उत्तम कलावंत म्हणून प्रसिद्धीच्या वलयात असतानाच आपल्या कलेचा लाभ येणाऱ्या भावी पिढीला व्हावा यासाठी त्याने अंबाजोगाई मध्ये सत्येंद्र फाउंडेशन संचलित बॉम् म्युझिक स्कूलची उभारणी केलेली असून या माध्यमातून शास्त्रीय उपशास्त्रीय पाश्चात्य लोकसंगीत या सर्वच कला प्रकारातील बारकावे लक्षात घेऊन त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना घडवले जात आहे. ओंकारचा कलावंत म्हणून सादरीकरणासाठी हा पहिलाच परदेश दौरा आहे. या दौऱ्यामध्ये हजारो पाश्चात्य रसिकांसमोर ओंकारला आपली कला सादर करण्याची उत्तम संधी या माध्यमातून मिळालेली आहे आणि हा फक्त ओंकारसाठीच नव्हे तर पूर्ण अंबाजोगाईकरांसाठी प्रचंड अभिमानाचा क्षण आहे. ओंकार रापतवार याने याच पद्धतीने कलाक्षेत्रामध्य यशाची शिखरे पदाकांत करावीत यासाठी त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

यापूर्वीही अनेक कलावंतांनी सादरीकरणासाठी परदेश वाऱ्या केलेल्याच आहेत परंतु ओंकार आपल्या रंगरेजा या कार्यक्रमाच्या माध्यमातून हजारो लाखो पाश्चात्य रसिकांसमोर फक्त कलाच सादर करणार आहे असं नव्हे तर त्याची ज्या पद्धतीने जडणघडण झाली आहे त्या पद्धतीने तो तेथील लाखो रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवेल हे नक्की. आणि एक गुरु म्हणून या लाडक्या शिष्याचा मला सार्थ अभिमानाचा आहे.

ताल मार्तंड प्रकाश बोरगावकर

# यावर्षीचा रखडलेला खरीप पीकविमा शेतकऱ्यांच्या खात्यावर तत्काळ जमा करा

## धनंजय गुंदेकर यांचे तालुका कृषी अधिकारी श्री गंडे यांना निवेदन

बीड (प्रतिनिधी)

यावर्षीचा खरीप पीकविमा नुकसान भरपाई रक्कम शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही.. दुष्काळी परिस्थिती असताना देखील शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान व पीकविमा पासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. खरीप हंगामाची पीकविमा रक्कम आतापर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होणे आवश्यक असल्याचे शेतकरी नेते धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे.

पुढील वर्षीचा खरीप हंगाम जवळ आला असून शेतकऱ्यांना हक्काच्या पीकविमा




नुकसान भरपाईची ही रक्कम ही बी भरणासाठी मिळणे आवश्यक आहे. तालुका कृषी अधिकारी श्री गंडे यांना निवेदन देत याबाबत लक्ष घालून लवकरात लवकर शेतकऱ्यांना खरीप व रब्बी पीकविमा शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करावा, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक तथा शेतकरी नेते धनंजय गुंदेकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा सचिव पदी अनिल वैरागे यांची निवड

## जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी केली पदाची घोषणा

केज (प्रतिनिधी)

राष्ट्रीय स्तरावर संपूर्ण देशभर काम करणार्या पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा सचिव पदी अनिल लिंबाजी वैरागे यांची निवड करण्यात आली आहे. पुरोगामी विचारांचा वारसा जपण्यासाठी व पुरोगामी विचारांची चळवळ तेवत ठेवण्यासाठी या पुरोगामी पत्रकार संघाची स्थापना केली असून गेल्या सहा वर्षांमध्येच या पत्रकार संघाच्या शाखा संपूर्ण देशामध्ये प्रत्येक



राज्यामध्ये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन झाल्या आहेत. याच विचाराचा प्रचार आणि प्रसार तसेच पत्रकारांच्या हितासाठी योग्य निर्णय व्हावेत यासाठीच संस्थापक अध्यक्ष विजय सुर्यवंशी यांनी पुरोगामी पत्रकार संघाची स्थापना केली आहे.

याच पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हा सचिव पदी अनिल वैरागे यांची दिनांक २२ मे २०२४ रोजी जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी निवड जाहीर केली.संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी,राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अढांगळे, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य अध्यक्ष संतोष जाधव ,राज्यसचिव निलेश ठाकरे,मराठवाडा अध्यक्ष शंकरसिंह ठाकूर,उपाध्यक्ष मुबशिर खतिब यांच्या आदेशानुसार अनिल वैरागे यांची जिल्हाध्यक्ष डी.एम.मुजमुले यांनी निवड जाहीर केली. अनिल वैरागे यांच्या निवडीचे मित्रपरिवार व पत्रकार बांधवांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.




बीड - पोलिस कर्मचारी अवेझ मोहम्मद यांचे बंधू इरफान मोहम्मद रईसुद्दिन यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना फहीम इनामदार, बंटी शेठ भिसे, माजीद भाऊ मित्र मंडळ उपस्थित होते.

# गेवराई बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावरच भला मोठा खड्डा; मोठ्या अपघाताची शक्यता

## आगार प्रमुखांचे दुर्लक्ष; अपघातात झाल्यानंतर आगार प्रमुख लक्ष देणार का..?

गेवराई : माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्यांच्या विधानसभा सदस्य कार्यकाळात गेवराई बस स्थानक अपुरे पडू लागले म्हणून नवे बस स्थानक मंजूर करून घेऊन तयार करून घेतले . मात्र हे सांभाळणे आगार प्रमुखाचे काम आहे . परंतु गेल्या सहा महिन्यापासून गेवराईच्या बस स्थानकाच्या प्रवेशद्वारावर भला मोठा खड्डा पडला असून आजूबाजूलाही छोटे छोटे खड्डे पडू लागले आहेत . त्यामुळे या ठिकाणाहून जाणाऱ्या बसेस खड्ड्यातून डुलत डुलत जात असल्याने एखादा मोठा अपघात झाल्यानंतर आगार प्रमुख याकडे लक्ष देणार आहेत काय ? आगार प्रमुख आगारातील कार्यालयात नुसते बसून राहत असल्याने त्यांना बस स्थानकावरील समस्या दिसत नाहीत . कोणतीही बस वेळ सोडली जात नाही, कोणतीही बस सूचना न देता बंद केली जाते, बसेसची दुरुस्ती, स्वच्छता आगारांमध्ये व्यवस्थित होत नाही . बसस्थानक रसवंती फ्रुट स्टॉल कॅन्टिन म्हणजे प्लॅटफॉर्म क्रमांक १ व २ पर्यंत प्रवाशांची दुचाकी - चारचाकी वाहने वेडी - वाकडी उभी असतात . त्याला शिस्त नाही . आगाराने उत्पन्नाची साधने वाढविली पण सुविधा दिल्या जात नाहीत . बऱ्याचदा चालकाला बस उभी करायला जागा नसते . त्यामुळे प्रवाशांचे हाल होतात . बसस्थानकात पोलिस ड्युटी अनिवार्य आहे . त्यांच्यावर आगारप्रमुखाचे दुर्लक्ष आहे . गर्दीच्या वेळी पाकिट मारणे ,चेन ओढणे अशा घटना वारंवार घडतात . बसेस काही अंतरावर गेल्यावर बंद पडतात . बस स्थानकामध्ये तीव्र उन्हाळ्याची गरज म्हणून




पानपोई सुरू करणे आवश्यक होते . परंतु दाखविण्यासाठी दोन रांजण भरून पाणी ठेवले आणि आपली जबाबदारी संपली अशा अविर्भावात आगार प्रमुख वावरत आहेत . हे बसस्थानक फक्त सकाळचे वेळेसच झाडझुड करून साफ स्वच्छ केले जाते परंतु दिवसातून दोन-तीन वेळेस बस स्थानक स्वच्छ करणे आवश्यक आहे .बस स्थानकामध्ये बीडहून येणाऱ्या बसेस खड्डा ओलांडत असताना कोणत्याही क्षणी एखाद्या बाजूला पलटी होवू शकतात . त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे . इतर गोष्टींना प्राधान्य न देता या खड्डा दुरुस्तीकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, अशी प्रवासी प्रवासी नागरिकांनी मागणी केली आहे .


# भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचाच्या यवतमाळ

## जिल्हा सहसचिव पदी अमरदीप कलाने यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अनेक नवोदित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच या राष्ट्रीय संघटनेच्या यवतमाळ जिल्हा सहसचिव पदी युवा कवी मा. अमरदीप नामदेवराव कलाने यांची निवड करण्यात आली आहे.अमरदीप कलाने हे अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील रासेगाव या गावचे रहिवासी आहेत.

कॉलेजमध्ये असताना त्यांना कविता लिहिण्याचा छंद लागला व त्यांनी आपला छंद कायम जोपासला. महाविद्यालयात




होणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ते हिरीरीने सहभाग घेतात आणि आपल्या कलेला अधिक बळकट करण्याचे सातत्याने प्रयत्न करीत असतात. त्यांची हीच साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील आवड बघून अमरदीप कलाने यांची भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचाच्या यवतमाळ जिल्हा सहसचिव पदी त्यांची निवड करण्यात आली. अमरदीप कलाने यांच्या निवडीबद्दल त्यांच्यावर सर्वत्र कौतुकांचा वर्षाव होत आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंचाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. विशाल शिरसाट , राष्ट्रीय उपाध्यक्ष मा.विजय जायभाये, अमरावती प्रदेश कार्याध्यक्ष मा.अविनाश ढळे, यवतमाळ जिल्हाध्यक्ष मा. स्वप्निल गोरे तसेच यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष मा. सौ सीमा अलोने मॅडम इत्यादींनी त्यांचे कौतुक केले.

# गॅरेज वर काम करत यश कांबळे या विद्यार्थ्याने १२ वीच्या परीक्षेत मिळवले ७० टक्के

बीड (प्रतिनिधी)

बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये बीड जिल्ह्याने छत्रपती संभाजीनगर विभागात पहिला क्रमांक पटकावला आहे. बीड शहरातील एक होतकरू विद्यार्थी यश मधुकर कांबळे याने १२ वी च्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे.



यश हा गॅरेज वर काम करतो. त्याचे वडील मधुकर कांबळे हे मिस्त्री काम करतात. अशा हलाखीच्या परिस्थितीत त्याने आपले १२ वी चे शिक्षण पूर्ण केले. १२ वी म्हणलं की पालक आपल्या पाल्यांना हमखास टीवीशन लावतात. त्यांना शिक्षणासाठी महागडे साहित्य देतात. मात्र यश या सर्वपासून वंचित होता. त्याला गॅरेज वर जाऊन काम करणे अत्यंत गरजेचे होते. त्यामुळे त्याने कसलीही टीवीशन न लावता मिळेल त्यावेळेत अभ्यास केला व १२ वी च्या परीक्षेत ७७.१७% टक्के मिळवले. त्याच्या या यशात आई सुरेखा कांबळे यांचे विशेष परिश्रम राहिले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

# जिवे मारण्याची धमकी देत जातीवाचक शिवीगाळ

## एक विरोधात गुन्हा दाखल

तलवाडा ।प्रतिनिधी

बायकोला आणि मुलीला शिवीगाळ केल्या प्रकरणी जाब विचारण्यासाठी गेलेल्या सचिन भोले यास गावातीलच राजु शेख याने शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली,इतकेच नव्हे तर तुझ्या बायकोला उचलून घेवून जाईल तुला काय करायचे ते कर अशा शब्दात धमकी दिल्या प्रकरणी तलवाडा पोलीस स्टेशन मध्ये सचिन भोले रा. गोळेगव यांच्या फिर्यादी वरून अनु .जाती अनु जमाती प्रतिबंधात्मक कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

या बाबत सविस्तर असे की,सचिन भोले आणि त्याची पत्नी व मुलगी गोळेगाव येथे मजुरी करून आपली उपजीविका भागवतात या कुटुंबाला गावातीलच शेख राजु याने त्रास दिला असून सचिन यांच्या घरी जाऊन सचिन भोले यांच्या पत्नीला आणि मुलीला १६ मे रोजी शिवीगाळ केली. सचिन संध्याकली कामावरून घरी आल्यावर बायकोने आणि मुलीने घडलेला प्रकार सांगितला नंतर दुसऱ्या दिवशी सकाळी गावातील चौकात शेख राजु याला सचिन ने तू माझ्या घरी येऊन बायकोला शिवीगाळ का केली असा जाब विचारला असता राजु याने उलट त्यालाच अश्लील भाषेत शिवीगाळ करत जातीवाचक शिव्या दिल्या इतकेच नव्हे तर तुझ्या बायकोला उचलून घेवून जाईल असे धकावत तुला काय करायचे ते कर म्हणत जिवे मारण्याची धमकी दिली.या प्रकरणी सचिन भोले यांनी तलवाडा पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली असून त्यांच्या फिर्यादी वरून आरोपी शेख राजु यांच्या विरोधात अनु.जाती अनु जमाती प्रतिबंधात्मक कायद्या नुसार कलम ३(१)ी, कलम ३(१)ी,५०४,५०६, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री निरज राजगुरू हे करत आहेत.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT